**वाचले :-** १) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (सर्वसाधारण शाखा) यांचेकडिल आदेश क्र.पसर/कावि/२४७६/१०, दि.८/१०/२०१०

२) पसर/कावि/१७६७/२०१३, दि.२२/१०/२०१३

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
सर्वसाधारण शाखा(अभिलेख कक्ष)
क्र.पसर/कावि/४६७/१६
दि. ४/४/२०१६

विषय:- केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम ५ (१) अन्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना पदनिर्देशित करणेबाबत

**आदेश**

ज्या अर्थी या कार्यालयाकडिल माहिती अधिकारी पदनिर्देशित करणेचा आदेश क्र.पसर/कावि/१७६७/२०१३, दि.२२/१०/२०१३ अन्वये गृह शाखे करीता सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून संबंधित लिपीक, शासकीय माहिती अधिकारी म्हणून अव्वल कारकून व अपिलीय प्राधिकारी म्हणून नायब तहसिलदार यांना पदनिर्देशित करण्यात आले होते.

कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजाचा जलद गतीने निपटारा होणेचे दृष्टीने माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(१) अन्वये प्राप्त प्रथम अपीले सत्वर निपटारा करण्यासाठी अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे पदामध्ये खालील प्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

त्या अर्थी मी सौरभ राव, जिल्हाधिकारी पुणे मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार व माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम ५(१) अन्वये गृह शाखेकरिता खालील प्रमाणे अपिलीय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांची पदे निर्देशित करीत आहे.

| शाखेचे नांव | पदाचे नाव | पदनिर्देशित अधिकारी |
|---|---|---|
| गृह शाखा | सहाय्यक माहिती अधिकारी | संबंधित अव्वल कारकून |
| | शासकीय माहिती अधिकारी | नायब तहसिलदार |
| | अपिलीय प्राधिकारी | तहसिलदार तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, पुणे |

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरित करणेत यावी.

जिल्हाधिकारी पुणे

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति:-

१) तहसिलदार तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, पुणे

२) नायब तहसिलदार, गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

३) सर्व संबंधित अव्वल कारकून, गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रत:- राष्ट्रीय सूचना अधिकारी, पुणे (NIC)

सदर आदेश जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे वेबसाईटवर प्रसिध्द करुन अहवाल पाठवावा.

सही x x x
जिल्हाधिकारी पुणे करिता